# जिल्हा परिषद भंडारा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना

PM POSHAN

## कंत्राटी डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता जाहिरात - 2023

जाहिरात क्रमांक :01 दिनांक : 13/10/2023

---

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना,शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत पंचायत समिती स्तरावरील रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील 11 महिन्याच्या कालावाधीकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणारी रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे :-

1) **आरक्षण** : **एकूण 02पदे**

| प्रवर्ग | अनु. जा. | अ. ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | अराखिव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |

2) **मासिक एकत्रित पारिश्रमिक (मानधन)** :- रु.20,650/-
(शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक2022/प्र.क्र.40/एस.डी.3, दि.01 जुन, 2022 नुसार देय राहिल.)

3) **शैक्षणिक व व्यावसायिक अहर्ता**:-
अ) किमान इयत्ता 12 वी पास आवश्यक . पदवीधर उमेदवारास प्राधान्य
ब) मराठी टायपिंग-30 श.प्र.मि.
क) इंग्रजी टायपिंग-40 श.प्र.मि.
ड) MS-CIT ही परीक्षा किंवा केंद्र शासनाची या संदर्भातील तुल्यबळ संगणकाची परीक्षा उत्तीर्ण

4) **वयोमर्यादा** :-दि.30 सप्टेंबर, 2023 रोजी सदर पदासाठी उमेदवाराचे वय किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे या दरम्यान असावे.

5) **निवड पध्दती**:-
महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचा निर्णय क्रमांक शापोआ/2019/प्र.क्र.74/एस.डी.-3, दि.29ऑक्टोंबर, 2020अन्वये खालील प्रमाणे निवड पध्दती.

अ) डेटा एन्ट्री ऑपरेटर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास इयत्ता 10 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इय्यता 12 वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला 10 गुण बोनस देण्यात येतील.

ब) अनुक्रमांक "अ" मध्ये विषद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परीक्षेकरीता एक पदासाठी गुणानुक्रमे 12 उमेदवार बोलावण्यात येतील. सदर उमेदवारांची मराठी टायपिंग-30 श.प्र.मि. व इंग्रजी टायपिंग-40 श.प्र.मि. आणि संगणक ज्ञानाची प्रात्याक्षिक परीक्षा घेण्यात येईल. यासाठी सर्व मिळून 100 गुण देण्यात येतील. सदर प्रात्याक्षित परीक्षेमध्ये किमान 50 गुण प्राप्त करणारे उमेदवार "डेटा एन्ट्री ऑपरेटर" च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

क) उमेदवारास संगणक परीक्षेमध्ये मिळालेले गुण (100 पैकी) व अनु.क्र. "अ" प्रमाणे शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करुन एकूण गुण देण्यात येतील व यानुसार उमेदवारांची निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्याप्रमाणे तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल.

ड) सदर पदासाठी **मुलाखत** घेण्यात येणार नाही.

6) **उमेदवारांसाठी सुचना** :-

7.1) उमेदवारांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील सांक्षाकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जाच्या पाकिटावर **"कंत्राटी डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज** असे नमूद करावे. उमेदवाराने अर्ज सदस्य सचिव तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचे कार्यालयातील **"प्रधान मंत्री पोषण आहार (PM-POSHAN) कक्ष"** मध्ये समक्ष किंवा अंतिम दिनांकाच्या पुर्वी पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून सादर करावे.

7.2) **परीक्षा शुल्क** :-उमेदवारांनी अर्जासोबत परीक्षा शुल्क म्हणून रक्कम रु.500/- इंडियन बॅक, साई मंदिर रोड भंडारा येथे खाते क्र. 50518875087 वर जमा करावे. व यशस्वी भरणा केल्याची छायांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

7.3) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय प्रमाणपत्र, प्रवर्ग निहाय जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, संदर्भातील कागद पत्रांच्या झेरॉक्स प्रती स्व स्वाक्षांकित (self attested) करुन जोडाव्यात.

7.4) निवड झालेल्या उमेदवारांना प्रवर्ग निहाय 6 महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity) सादर करणे बंधनकारक राहिल.

7.5) **अर्ज करण्याची अंतिम तारीख 31/10/2023 असेल**. यांनतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

7.6) उमेदवारांचा नियुक्ती कालावधी तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याचा राहील.

7.7) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एन्टी ऑपरेटर या कर्मचाऱ्यास एक वर्षाच्या कंत्राटी सेवेमध्ये 8 नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील.

7.8) कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

7.9) डेटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही. तसेच 11 महिन्याच्या कंत्राटी सेवेच्या आधारावर त्याला शासकीय सेवेमध्ये नियुक्तीसाठी कोणतेही हक्क असणार नाहीत.

7.10) संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द शासकीय कामकाजाबाबत तक्रार आल्यास व त्यानुसार दोषी आढळल्यास विहित कालावधीपूर्वीच कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

7.11) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास करारनामा करुन दयावा लागेल. व सदर करारनामा संबंधित कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करणे आवश्यक आहे.

7.12) कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एन्ट्री ऑपरेटर या कर्मचाऱ्यासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती यासंदर्भात आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

7.13) परिपूर्ण अर्ज सादर करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अपूर्ण माहिती असलेले कोणतेही अर्ज रदद करण्यात येतील.

7.14) परीक्षेच्या वेळी येतांना आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स (Smart Card पध्दतीचे) यापैकी किमान एक मुळ ओळखपत्र व छायांकीत प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

7.15) पात्र उमेदवारांची संगणक प्रात्याक्षिक व मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा ही संगणकीय प्रणाली मार्फत घेण्यात येईल.

7.16) सदर भरतीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर 01 (एक) वर्षाच्या आत एखाद्या ठिकाणी कंत्राटी कर्मचारी यांनी राजीनामा दिल्याने पद रिक्त झाल्यास प्रतिक्षाधीन यादीवरील गुणानुक्रमे उमेदवारास नियुक्ती आदेश दिला जाईल. प्रतिक्षाधीन यादी 1 (एक) वर्षासाठी ग्राहय धरण्यात येईल.

7.17) भरती प्रक्रियेबाबत तसेच उमेदवार पात्र व अपात्रता बाबतचा अंतिम निर्णय हा निवड प्रक्रिया समितीचा राहील.

7.18) सदर परीक्षेस बसण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या https://bhandarazp.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

7.19) भरती संबंधित नवीन सूचना, परीक्षेचा दिनांक, वेळ व स्थळ, सदर परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची गुणानुक्रमे यादी याबाबत माहिती जिल्हा परिषदेच्या https://bhandarazp.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. व्यक्तिश: अर्जदाराला संपर्क केला जाणार नाही. अर्जदाराने वेळोवेळी संकेतस्थळावर भेट देणे आवश्यक आहे.

**स्वाक्षरी**/-
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, भंडारा

**स्वाक्षरी**/-
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, भंडारा

# जिल्हा परिषद भंडारा

शिक्षण विभाग (प्राथमिक)

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (PM-POSHAN) योजना

## डेटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज - 2023

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक** ..................... **दिनांक** :- ........................

**प्रति,**

सदस्य सचिव,
जिल्हा निवड प्रक्रिया समिती,
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

उमेदवाराचाअलिकडच्याकाळातीलपासपोर्टसाइजफोटो

**विषय : प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना.**
**डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरीता अर्ज.**

❖ **उमेदवाराचे तपशिल** :-

1) उमेदवाराचे नाव : श्री / श्रीमती ------------------------------------------------------------------------------

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडील/पतीचे नाव)

2) पत्रव्यवहाराचा पत्ता : ---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------

3) जन्म तारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) : / /

4) जातीचा प्रवर्ग : -------------------- जात : ------------------

5) E-mail ID : ---------------------------------------------------

6) भ्रमणध्वनी क्र. : --------------------

7) वय (30 सप्टेंबर, 2023 रोजी) : -----------वर्ष -----------महिने-----------दिवस

8) **अर्जदाराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता** :

| अ.क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षा मंडळ/ विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इयत्ता 10 वी | | | | |
| 2 | इयत्ता 12 वी | | | | |
| 3 | पदवी | | | | |
| 4 | मराठी टंकलेखन-30 | | | | |
| 5 | इंग्रजी टंकलेखन-40 | | | | |
| 6 | MS-CIT / तत्सम परीक्षा उत्तीर्ण | | | | |

9) **अर्जासोबत सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती * (आवश्यक)** :

| अ.क्र. | **सादर करावयाचे प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती** | |
|---|---|---|
| 1 | इयत्ता 10 वी च्या गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 2 | इयत्ता 12 वी च्या गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 3 | पदवी गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 4 | मराठी टंकलेखन-30 गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 5 | इंग्रजी टंकलेखन-40 गुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 6 | MS-CIT / तत्सम परीक्षागुणपत्रीकेची छायांकित प्रत | |
| 7 | जात प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Caste Certificate) | |
| 8 | जात वैधता प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Caste Validity) | |
| 9 | अधिवास प्रमाणपत्रची छायांकित प्रत (Domicile Certificate) | |

---

# प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत नाही.

दिनांक : / /

स्थळ : ------------------

**(उमेदवाराची स्वाक्षरी व नाव)**

---

*****